महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेंतर्गत राज्य तक्रार निवारण समिती व जिल्हा संनियंत्रण व तक्रार निवारण समितीवर ज्येष्ठ नागरिकांचे प्रतिनिधी समाविष्ट करण्याबाबत..

**महाराष्ट्र शासन**

**सार्वजनिक आरोग्य विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः ज्येष्ठना-२०२३/प्र.क्र.३७७/आरोग्य-६**

गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार, संकुल इमारत,

४००००१ -मुंबई ,वा मजला १०

दिनांक : ०७ जून, २०२४

**वाचा :-**

१) शासन निर्णय क्रमांकः मफुयो-२०२३/प्र.क्र.१६०/आरोग्य-६, दिनांक २८.०७.२०२३

२) मा. मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री राज्य अतिथीगृह येथे " ज्येष्ठ नागरिकांच्या प्रलंबित मागण्याबाबत" या विषयाबाबत झालेली बैठक दिनांक १७.०५.२०२३

३) उपमुख्य कार्यकारी अधिकारी, राज्य आरोग्य हमी सोसायटी, वरळी, मुंबई यांचे क्र. राआहसो/प्रशा/उव्य/६१७७ भाग १/२३४८/२०२३, दिनांक २८.११.२०२३

**प्रस्तावना :-**

आयुष्मान भारत- प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेच्या प्रभावी अंमलबाजवणी होण्यासाठी योजनेत उद्भवणाऱ्या विविध तांत्रिक व महत्वपुर्ण बाबींवर तातडीने निर्णय घेण्यासाठी अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली राज्य संनियंत्रण समिती व कार्यकारी समिती तसेच राज्य स्तरावर समन्वय, अंगीकरण व शिस्तपालन समिती, अंतिम दावे निराकरण समिती, राज्य तक्रार निवारण समिती व जिल्हा स्तरावर जिल्हा संनियंत्रण व तक्रार निवारण समिती अशा समित्यांचे शासनाच्या संदर्भ क्र. १ च्या दिनांक २८.०७.२०२३ च्या शासन निर्णयान्वये गठन करण्यात आलेले आहे. महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजने अंतर्गत ज्येष्ठांच्या आरोग्य समस्या सोडविण्यास मदत होण्याच्या अनुषंगाने परिशिष्ट-१ मधील राज्य तक्रार निवारण समिती व जिल्हा संनियंत्रण व तक्रार निवारण समिती या समित्यांवर ज्येष्ठ नागरिकांचे प्रतिनिधी समाविष्ट करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

आयुष्मान भारत- प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजने अंतर्गत दिनांक २८.०७.२०२३ रोजीच्या शासन निर्णयातील परिशिष्ट -१ नुसार गठीत करण्यात आलेल्या समित्यांमधील राज्यस्तवरील राज्य तक्रार निवारण समितीमध्ये महाराष्ट्र ज्येष्ठ नागरीक महासंघ, मुंबई

(FESCOM) या संस्थेचे अध्यक्ष व उपाध्यक्ष यांचा अशासकीय सदस्य म्हणून समावेश करण्यात येत आहे. तसेच जिल्हास्तरावरील - जिल्हा संनियंत्रण व तक्रार निवारण समितीमध्ये महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघ, मुंबई (FESCOM) यांच्याकडून वरील समितीच्या अध्यक्षांकडे शिफारस केलेल्या दोन ज्येष्ठ नागरिकांचा सदस्य म्हणून समावेश सदर समितीवर करण्यात यावा, असा निर्णय घेण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२४०६०७११४४३४२७१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SANJAY DATTARAM MAHADESHWAR

Digitally signed by SANJAY DATTARAM MAHADESHWAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=PUBLIC HEALTH DEPARTMENT, 2.5.4.20=759d43d3ca03f08520a6d49169531e74206cd390898bbe0690fead8f00f6a3eb, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=09A8917EDE715503310B61D8A24357A945B188F3A254ABA25AC8365BB66E4EE8, cn=SANJAY DATTARAM MAHADESHWAR
Date: 2024.06.05 15:27:09 +09'00'

**संजय महाडेश्वर**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई
२) मा. मुख्यमंत्री, यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३) मा. उपमुख्यमंत्री (गृह) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
४) मा. उपमुख्यमंत्री (वित्त) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
५) मा. मंत्री, आरोग्य व कुटुंब कल्याण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६) मा. मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
७) मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद/विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई
८) सर्व मा. विधानपरिषद/ विधानसभा सदस्य, विधानमंडळ, विधानभवन, मुंबई- २१
९) मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१०) अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव-१, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई
११) अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/ सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य, विभाग, मंत्रालय, मुंबई
१२) अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई
१३) प्रधान सचिव, विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई
१४) आयुक्त, आरोग्य सेवा व कुटुंब कल्याण तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान मुंबई -०१
१५) विभागीय आयुक्त (सर्व)
१६) मुख्य कार्यकारी अधिकारी, राज्य आरोग्य हमी सोसायटी, वरळी, मुंबई
१७) अतिरीक्त आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालीका, मुंबई
१८) जिल्हाधिकारी (सर्व)

१९) संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई
२०) संचालक, वैद्यकिय शिक्षण विभाग, बृहन्मुंबई महानगरपालीका, मुंबई
२१) संचालक, वैद्यकिय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई
२२) जिल्हा शल्य चिकित्सक (सर्व)
२३) संचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई
२४) सहसंचालक/उपसंचालक, आरोग्य सेवा परिमंडळे (सर्व)
२५) जिल्हा माहिती अधिकारी (सर्व)
२६) अधिष्ठाता, शासकीय वैद्यकिय महाविद्यालये व रुग्णालये (सर्व)
२७) सह सचिव /उप सचिव/ सर्व कार्यासने सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई
२८) महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघ (FESCOM), मुंबई ज्येष्ठ नागरिक भवन, सेक्टर १२, प्लॉट नं. ७सी, गांवदेवी मंदिरामागे, नेरुळ (प), नवी मुंबई - ४०० ७०६
२९) भारतीय जनता पक्ष , महाराष्ट्र प्रदेश वसंतराव भगवान चौक, नरीमन पाईंट , मुंबई-२०
३०) शिवसेना, शुभ-दीप बंगलो, लँडमार्क सोसायटी, ठाणे.
३१) शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे), शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर मुंबई- २८
३२) इंडीयन नॅशनल कॉग्रेस, महाराष्ट्र प्रदेश कॉग्रेस (आय)समिती टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई
३३) राष्ट्रवादी कॉग्रेस पक्ष, राष्ट्रवादी भवन, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरीमन पाईंट मुंबई- २१
३४) बहुजन समाज पक्ष, डी-१ इन्सा हटमेंट, आझाद मैदान, मुंबई ४०० ००१
३५) भारतीय कम्युनिस्ट पक्ष, महाराष्ट्र कमिटी, ३१४, राजभवन, एस. व्ही. पटेल रोड, मुंबई ४०० ००४
३६) भारतीय कम्युनिस्ट पक्ष, मार्क्सवादी, महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी, मुंबई -१३
३७) श्री. अण्णासाहेब टेकाळे, उपाध्यक्ष, महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघ (फेस्कॉम), मुंबई
३८) निवड नस्ती.